# गिरणा उपखोऱ्याचा एकात्मिक जल आराखडा
## लाभधारकांशी सल्लामसलत कार्यशाळा
## तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
## लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव
## गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव

कलेक्टर ऑफिस समोर, आकाशवाणी चौक, जळगाव - ४२५ ००१

फोन नं. ०२५७-२२३३९१४ E-mail ID - eegid.jal2015@gmail.com

१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५ अन्वये राज्याचा खोरे/उपखोरेनिहाय एकात्मिक जल आराखडा (Integrated State Water Plan) तयार करणे अनिवार्य आहे. गिरणा उपखोऱ्याचा प्रारूप जल आराखडा तयार करण्यात आला आहे.

२) उपखोऱ्यातील भूपृष्ठावरील व भूगर्भातील पाण्याचा एकात्मिक जल आराखडा तयार करणे, जल संपत्ती विकसनाचे प्रकल्प निश्चित करणे व त्याचा प्राधान्यक्रम ठरविणे, जलसंधारण तसेच पाण्याचा गुणवत्तेचे संरक्षण व त्यामध्ये निरंतर सुधारणा करणे ही या जल आराखड्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

३) गिरणा उपखोऱ्यामध्ये खालील जिल्हा/तालुक्यांचा समावेश होतो.
   १) जळगाव जिल्हा - चाळीसगाव, भडगाव, एरंडोल, पारोळा, जळगाव, धरणगाव.
   २) नाशिक जिल्हा - मालेगाव, नांदगाव, कळवण, सटाणा, चांदवड, देवळा, सुरगाणा.
   ३) औरंगाबाद जिल्हा - कन्नड, सोयगाव, वैजापूर, सिल्लोड.

४) प्रारूप जल आराखडा पुस्तिका व संक्षिप्त माहिती पुस्तिका जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०८/२०१७ पासून उपलब्ध करणेत येत आहेत. तसेच खालील संपर्क कार्यालयात पाहणेसाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हा | संपर्क अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | श्री.एम.आर. मिठ्ठे, उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, जळगाव | (फो) ०२५७-२२३३९१४<br>(मो) ९४२३७४२१६५ |
| | | श्री.राहुल मुंडके, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव | (फो) ०२५७-२२२०४००/ २२२०८०० |
| २ | नाशिक | श्री.आर.ए. पाटील, सहाय्यक अभियंता श्रेणी-१, पाटबंधारे उपविभाग, चाळीसगाव | (फो) ०२५८९-२२२५७४<br>(मो) ९८२२०४३८३३ |
| | | श्री.आर.ए. मोरे, उपविभागीय अधिकारी/ प्रांताधिकारी कार्यालय, मालेगाव | (मो) ७०२०२५२०७२ |
| ३ | औरंगाबाद | श्री.एस.एच. रेड्डी, उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, धरणगाव | (फो) ०२५८८-२५१३२९<br>(मो) ९७६४१८५८११ |
| | | श्री.संतोष बोरड, प्र.उपविभागीय अधिकारी/ प्रांताधिकारी कार्यालय, सिल्लोड | (फो) ०२४३०-२२२१७२<br>(मो) ९४०५४८६७०० |

५) गिरणा उपखोऱ्याचा एकात्मिक जल आराखडा मसुदा अंतिम करण्यापूर्वी संबंधित लाभार्थी/वापरकर्ते यांची मते आजमावून घेणे व संबंधित घटकांशी सल्लामसलत करणे करिता (Stake Holder Consultation) कार्यशाळा घेण्याचे प्रस्तावित आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | वेळ | ठिकाण | संपर्क कार्यालय |
|---|---|---|---|
| ३१/०८/२०१७ | १०.०० ते १४.०० वाजेपर्यंत | अल्प बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव | अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव<br>E-Mail- cadajalgaon@gmail.com<br>Fax No. 0257-2239845<br>Tel. No. 0257-2235880 |

६) इच्छुक लाभार्थी/वापरकर्त्यांनी उपलब्ध प्रारूप जल आराखड्यासंबंधी आपले मत / अभिप्राय लेखी स्वरूपात कार्यशाळेमध्ये द्यावेत अथवा प्रत्यक्ष, पोष्टाने, ई-मेलद्वारे दि. ३०/०८/२०१७ पर्यंत अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव या कार्यालयाकडे द्यावेत.

७) बैठकीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी स्वखर्चाने येणे अपेक्षित आहे.

जा.क्र.कडा/तांत्रिक-१/३७९०/सन २०१७
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव.
दिनांक : १०/८/२०१७

सही/-
**अधीक्षक अभियंता व प्रशासक,**
**लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव.**